॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' gr

Fax : (02462) 215572
Phone: (02462) 215246

## OFFICE OF THE REGISTRAR

website: srtmun.ac.in
Email: registrar@srtmun.

आस्था/०२/परिपत्रक/जीवनशैली बदलाबाबत/२०२६–२७/९२ दिनांक १४/०५/२०२६ ९५

**भारताचे मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार सार्वजनिक वाहनांचा वापर, इंधन बचत, स्वदेशीचा आग्रह, परदेश दौरे आणि जीवनशैलित बदलाबाबत जनजागृति करणेबाबत.**

**— परिपत्रक —**

**संदर्भ:** (१) महाराष्ट्र शासन, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्रमांक उशिसं/ जीवन शैली बदलाबाबत/मवि–१/२०२६/ई/६८५ दिनांक १३ मे, २०२६ रोजीचे पत्र.

(२) महाराष्ट्र शासन, शिक्षण सहसंचालक,उच्च शिक्षण, नांदेड विभाग यांचे पत्र क्रमांक ससंउशिनां/ /अनु–२/२०२६–२७/ दिनांक १४ मे, २०२६ रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भान्वये प्रस्तुत विद्यापीठांतर्गत सर्व शैक्षणिक संकुले व प्रशासकीय विभाग, उप परिसर, लातूर व परभणी, न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली, कै. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट तसेच विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना या परिपत्रकान्वये, कळविण्यात येते की, भारताचे मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी देशाला उद्देशून केलेल्या आवाहनानुसार सध्याच्या जागतिक परिस्थितीचा विचार करता, आपल्या देशाची आर्थिक स्थिती अधिक बळकट करण्यासाठी आणि विकासाचे उद्दिष्ठ साध्य करण्यासाठी खालील मुद्दयांचे पालन करणेबाबत आवाहन केले आहे:

१. **सार्वजनिक वाहतूकीचा वापर:** शक्य असेल तिथे खाजगी वाहनांचा वापर टाळून मेट्रो, रेल्वे आणि इतर सार्वजनिक वाहतूक साधनांचा वापर करावा. त्यामुळे इंधनाची बचत होईल आणि पर्यावरणाचे रक्षण होईल.

२. **इंधन व उर्जा बचत:** पेट्रोल–डिझेलचा मर्यादित वापर आणि इलेक्ट्रिक वाहनांना प्राधान्य देण्याबाबत सर्व शैक्षणिक संस्थांनी पुढाकार घ्यावा. 'कार–पूलिंग' (Car-pooling) सारख्या संकल्पनांना प्रोत्साहन द्यावे.

३. **परदेश दौरे व अनावश्यक खर्च:** सध्याची परकीय चलन साठयाची स्थिती आणि जागतिक परिस्थिती पाहता, तातडीचे किंवा अपरिहार्य असल्याशिवाय परदेश दौरे टाळावेत.

४. **महत्त्वाच्या/अतिमहत्त्वाच्या बैठकां:** महत्त्वाच्या/अतिमहत्त्वाच्या बैठकांव्यतिरिक्त इतर बैठका प्रत्यक्ष उपस्थित राहून घेण्याऐवजी ऑनलाईन माध्यमातून (Online Meeting) आणि व्हीडिओ कॉन्फरन्सिंगव्दारे घेण्यास प्राधान्य द्यावे.

५. **स्वदेशीचा आग्रह:** भारताची आयात व वित्तीय तूट कमी करण्यासाठी आणि आत्मनिर्भर भारताला पाठबळ देण्यासाठी जास्तीत–जास्त स्वदेशी वस्तुंचा वापर करावा.

६. **जीवनशैलीत बदल:** स्थानिक पर्यटनाला (Domestic Tourism) चालना देणे यांसारख्या उपक्रमांचा अवलंब करावा.

राज्यातील सर्व विद्यापीठे, महाविद्यालये आणि उच्च शैक्षणिक संस्थांनी या आवाहनाची गांभीर्याने दखल घ्यावी. शैक्षणिक संकुलांमध्ये (Campuses) या विषयावर चर्चासत्रे, वेबीनार, आणि जनजागृति मोहिमा राबवून विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना या मोहिमेत सहभागी करून घ्यावे. असे आवाहन महाराष्ट्र शासनाच्या वतीने करण्यात आलेले आहेत. सदर आवाहनाला प्रतिसाद देवून त्याप्रमाणे कार्यवाही करावी व संक्षिप्त अहवाल विद्यार्थी विकास विभाग/राष्ट्रीय सेवा योजना विभागास सादर करावा.

(प्रा.(डॉ.) ज्ञानेश्वर दा. पवार)
प्र.कुलसचिव
कुलसचिव
स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

प्रति,

**(१) मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.**

**(२) मा. संचालक, सर्व शैक्षणिक संकुले तसेच मा. विभागप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग, प्रस्तुत विद्यापीठ**

**(३) मा. संचालक, उपपरिसर, लातूर व परभणी.**

**(४) मा. प्राचार्य, न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली.**

**(५) कै. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट**

**(६) संचालक, विद्यार्थी विकास विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.**

**(७) संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, प्रस्तुत विद्यापीठ.**

**(८) सिस्टिम एक्स्पर्ट, प्रस्तुत विद्यापीठ** (प्रत संकेतस्थळावर ठेवण्यासाठी)

(प्रा.(डॉ.) ज्ञानेश्वर दा. पवार)
प्र.कुलसचिव
कुलसचिव
स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

प्रत माहितीस्तव –

**१. मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.**

**२. मा. प्र–कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.**

JDNAN-NGCOANUN(NND)/313/2026-COURT


**महाराष्ट्र शासन**

**सहसंचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड**

**शासकीय तंत्रनिकेतनच्या पाठीमागे, आनंदनगर रोड, दत्त मंदिराशेजारी, दयानंद नगर, नांदेड ४३१६०१**

दुरध्वनी क्र: - ०२४६२-२८३३१४४ Website: - https://jdhenanded.info/

E-mail: jdhe.nanded@yahoo.co.in E-mail:jdhe.nanded-mh@gov.in


जा.क्र.ससंउशिनां/अनु-२ /२०२६-२७/ दि. .०५.२०२६

परिपत्रक

**प्रति,**

१. कुलसचिव,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

२. प्राचार्य,
शासकीय, अशासकीय अनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये,
नांदेड विभाग, नांदेड

**विषयः भारताचे मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार सार्वजनिक वाहनांचा वापर, इंधन बचत, स्वदेशीचा आग्रह, परदेश दौरे आणि जीवनशैलीत बदलाबाबत जनजागृती करणेबाबत.**

**संदर्भः १. मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रहिताच्या दृष्टीने केलेले आवाहन.**
**२. उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्र.६८५ दि.१३.०५.२०२६**

उपरोक्त विषयान्वये आपणास सूचित करण्यात येते की, देशाचे मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी देशाला उद्देशून केलेल्या आवाहनानुसार सध्याच्या जागतिक परिस्थितीचा विचार करता, आपल्या देशाची आर्थिक स्थिती अधिक बळकट करण्यासाठी आणि विकासाचे उद्दिष्ठ साध्य करण्यासाठी खालील मुद्द्यांचे पालन करणेबाबत आवाहन केले आहे.

१. सार्वजनिक वाहतुकीचा वापरः शक्य असेल तिथे खाजगी वाहनांचा वापर टाळून मेट्रो रेल्वे आणि इतर सार्वजनिक वाहतूक साधनांचा वापर करावा. यामुळे इंधनाची बचत होईल आणि पर्यावरणाचे रक्षण होईल.

२. इंधन व ऊर्जा बचतः पेट्रोल-डिझेलचा मर्यादित वापर आणि इलेक्ट्रिक वाहनांना प्राधान्य देण्याबाबत सर्व शैक्षणिक संस्थांनी पुढाकार घ्यावा. 'कार-पूलिंग' (Car-pooling) सारख्या संकल्पनांना प्रोत्साहन द्यावे.

३. परदेश दौरे व अनावश्यक खर्चः सध्याची परकीय चलन साठ्याची स्थिती आणि जागतिक परिस्थिती पाहता, तातडीचे किंवा अपरिहार्य असल्याशिवाय परदेश दौरे टाळावेत.

४. महत्वाच्या/अतिमहत्वाच्या बैठकांव्यतिरिक्त इतरं बैठका प्रत्यक्ष उपस्थित राहून घेण्याऐवजी ऑनलाईन माध्यमातून (Online Meetings) आणि व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेण्यास प्राधान्य द्यावे.

५. स्वदेशीचा आग्रहः भारताची आयात व वित्तीय तूट कमी करण्यासाठी आणि आत्मनिर्भर भारताला पाठबळ देण्यासाठी जास्तीत जास्त स्वदेशी वस्तूंचा वापर करावा.

६. जीवनशैलीत बदलः स्थानिक पर्यटनाला (Domestic Tourism) चालना देणे यांसारख्या उपक्रमांचा अवलंब करावा.

या विभागातील विद्यापीठ व महाविद्यालये आणि उच्च शैक्षणिक संस्थांनी या आवाहनाची गांभीर्याने दखल घ्यावी. शैक्षणिक संकुलांमध्ये (Campuses) या विषयावर चर्चासत्रे, वेबिनार आणि जनजागृती मोहिमा राबवून

विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना या मोहिमेत सहभागी करून घ्यावे. तरी, आपल्या स्तरावरून या संदर्भात तात्काळ सूचना निर्गमित कराव्यात आणि केलेल्या कार्यवाहीचा संक्षिप्त अहवाल या कार्यालयास सादर करावा.

Digitally signed by
Babasaheb Dadasaheb Bhosale
Date: 14-05-2026 18:02:46

**(डॉ.बाबासाहेब भोसले)**
सहसंचालक,
उच्च शिक्षण नांदेड विभाग,नांदेड.

प्रत:- मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, म. रा. पुणे यांना माहितीस्तव सादर.

**महाराष्ट्र शासन**

**उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य**

**४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६**

Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२२११९

क्र. उशिसं/जीवन शैली बदलाबाबत/मवि-१/२०२६/ई /685 दि.१३.५.२०२६

13 MAY 2026

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

२. सर्व कुलसचिव,
राज्य सार्वजनिक विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

विषयः भारताचे मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार सार्वजनिक वाहनांचा वापर, इंधन बचत, स्वदेशीचा आग्रह, परदेश दौरे आणि जीवनशैलीत बदलाबाबत जनजागृती करणेबाबत.

संदर्भः मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रहिताच्या दृष्टीने केलेले आवाहन.

उपरोक्त विषयान्वये आपणास सूचित करण्यात येते की, देशाचे मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी देशाला उद्देशून केलेल्या आवाहनानुसार सध्याच्या जागतिक परिस्थितीचा विचार करता, आपल्या देशाची आर्थिक स्थिती अधिक बळकट करण्यासाठी आणि विकासाचे उद्दिष्ठ साध्य करण्यासाठी खालील मुद्द्यांचे पालन करणेबाबत आवाहन केले आहे.

1. सार्वजनिक वाहतुकीचा वापरः शक्य असेल तिथे खाजगी वाहनांचा वापर टाळून मेट्रो रेल्वे आणि इतर सार्वजनिक वाहतूक साधनांचा वापर करावा. यामुळे इंधनाची बचत होईल आणि पर्यावरणाचे रक्षण होईल.
2. इंधन व ऊर्जा बचतः पेट्रोल-डिझेलचा मर्यादित वापर आणि इलेक्ट्रिक वाहनांना प्राधान्य देण्याबाबत सर्व शैक्षणिक संस्थांनी पुढाकार घ्यावा. 'कार-पूलिंग' (Car-pooling) सारख्या संकल्पनांना प्रोत्साहन द्यावे.
3. परदेश दौरे व अनावश्यक खर्चः सध्याची परकीय चलन साठ्याची स्थिती आणि जागतिक परिस्थिती पाहता, तातडीचे किंवा अपरिहार्य असल्याशिवाय परदेश दौरे टाळावेत.
4. महत्वाच्या/अतिमहत्वाच्या बैठकांव्यतिरिक्त इतर बैठका प्रत्यक्ष उपस्थित राहून घेण्याऐवजी ऑनलाईन माध्यमातून (Online Meetings) आणि व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेण्यास प्राधान्य द्यावे.
5. स्वदेशीचा आग्रहः भारताची आयात व वित्तीय तूट कमी करण्यासाठी आणि आत्मनिर्भर भारताला पाठबळ देण्यासाठी जास्तीत जास्त स्वदेशी वस्तूंचा वापर करावा.
6. जीवनशैलीत बदलः स्थानिक पर्यटनाला (Domestic Tourism) चालना देणे यांसारख्या उपक्रमांचा अवलंब करावा.

राज्यातील सर्व विद्यापीठे, महाविद्यालये आणि उच्च शैक्षणिक संस्थांनी या आवाहनाची गांभीर्याने दखल घ्यावी. शैक्षणिक संकुलांमध्ये (Campuses) या विषयावर चर्चासत्रे, वेबिनार आणि जनजागृती मोहिमा राबवून विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना या मोहिमेत सहभागी करून घ्यावे. तरी, आपल्या स्तरावरून आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व महाविद्यालयांना आणि विभागांना या संदर्भात तात्काळ सूचना निर्गमित कराव्यात आणि केलेल्या कार्यवाहीचा संक्षिप्त अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)
प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे -१६

प्रत माहितीसाठी सादरः

मा. स्वीय सहाय्यक, मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-32.

मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-32.